सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २८६ | बुधवार, दि. ८ जुलै २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

रवि ज्वेलर्स
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
सोने-चांदी
आजचे भाव
२४ सोने ९९.५०% : ₹ १४३०००
२२ सोने ९१.६०% : ₹ १३१५००
१८ सोने ७५.००% : ₹ १०९०००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २३५०/-
भाव प्रती १० ग्रॅम

# मुरुमाची मलमपट्टी आणखी किती दिवस? महात्मा फुले कॉलनीचा रस्ता अखेर कधी होणार?

## पालिकेच्या कारभाराबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील महात्मा फुले कॉलनीतील नागरिकांचा संयम आता संपत चालला असून, पक्का रस्ता नसल्यामुळे दरवर्षी पावसाळ्यात नागरिकांना चिखल, खड्डे आणि साचलेल्या पाण्याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. वारंवार मागणी करूनही कायमस्वरूपी रस्ता न झाल्याने नगर परिषदेच्या कारभाराबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, दरवर्षी पावसाळ्यापूर्वी केवळ मुरूम टाकून तात्पुरती मलमपट्टी केली जाते. मात्र, काही दिवसांतच तो मुरूम पावसाच्या पाण्यासोबत वाहून जातो आणि रस्ता पुन्हा चिखलमय होतो. यंदा तर मुरूम टाकण्याची साधी व्यवस्था देखील करण्यात आलेली नसल्याने नागरिकांचा संताप अधिकच वाढला आहे.

रस्त्यावरील चिखल आणि साचलेल्या पाण्यामुळे शाळकरी विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. दुचाकी घसरून अपघात होण्याचा धोका वाढला असून, पायी चालणाऱ्यांनाही जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असल्याचे नागरिकांनी सांगितले.

"कर भरताना आम्ही नागरिक, पण सुविधा देताना आम्ही दुय्यम का?" असा थेट सवाल महात्मा फुले कॉलनीतील नागरिकांनी उपस्थित केला आहे. तात्पुरत्या उपाययोजनांऐवजी दर्जेदार आणि कायमस्वरूपी सिमेंट काँक्रीट अथवा डांबरी रस्ता तातडीने करण्यात यावा, अशी त्यांची मागणी आहे.

नगर परिषद प्रशासनाने या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन कायमस्वरूपी रस्त्याचे काम हाती घ्यावे, अन्यथा तीव्र लोकआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा महात्मा फुले कॉलनीतील नागरिकांनी दिला आहे.







प्रा. लक्ष्मण निळे
अमळनेर


श्री. प्रमोद निळे
अमळनेर


प्रा. सौ. शीलाताई पाटील
अमळनेर


श्री. प्रदीप पवार
अमळनेर


श्री. भरत ससाणे
अमळनेर / जळगाव


डॉ. राजेंद्र पिंगळे
अमळनेर/पुणे

# अमळनेरमध्ये गुरुवारी जनसमाधान बैठक

## नागरिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अमळनेर उपविभागातील अमळनेर व चोपडा या तालुक्यांतील नागरिकांच्या विविध समस्या, दैनंदिन प्रशासकीय प्रश्न, अडीअडचणी व तक्रारींचे स्थानिक स्तरावर जलद, समन्वयाने आणि कालबद्ध निवारण व्हावे, या उद्देशाने जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या संकल्पनेतून उपविभाग स्तरावर 'जनसमाधान बैठक' हा लोकाभिमुख उपक्रम राबविण्यात येत आहे.

या उपक्रमांतर्गत गुरुवार, दि. ९ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता अमळनेर येथील इंदिरा भवनात (स्टेट बँकेमागे) जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जनसमाधान बैठकीचे आयोजन केले आहे. या बैठकीत अमळनेर व चोपडा या तालुक्यांतील नागरिकांच्या विविध समस्या, दैनंदिन प्रशासकीय अडचणी व तक्रारींचे निवारण करण्यात येणार असून, दोन्ही तालुक्यांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी मयूर भंगाळे यांनी केले आहे.

दरम्यान, नागरिकांनी लोकशाही दिनांतर्गत केलेले अर्ज, माहितीचा अधिकार कायद्यांतर्गत अर्ज, भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे सादर केलेले अर्ज, न्यायालयीन अथवा न्यायप्रविष्ट प्रकरणे, शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्या, सेवाविषयक बाबी तसेच वैयक्तिक माहिती मिळविण्यासंदर्भातील अर्ज या बैठकीत आणू नयेत, असेही प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# महिला अधिकाऱ्याची 'फेक ई-मेल'द्वारे बदनामी

## दोषींवर कठोर कारवाईची समाजसेवक ठाकूर यांची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : 'फेक ई-मेल आयडी' तयार करून महिला शासकीय अधिकाऱ्याचे तसेच त्यांच्या अधिकारी पतीचे नाव जोडून वैयक्तिक स्वरूपाचे फोटो, कथित चॅट आणि बदनामीकारक मजकूर मोठ्या प्रमाणावर प्रसारित केला. या प्रकरणी दोषींविरुद्ध सखोल चौकशी करून कठोर कायदेशीर कारवाई व्हावी, अशी मागणी समाजसेवक जितेंद्र ठाकूर यांनी जळगाव पोलीस अधीक्षक तसेच सायबर पोलीस ठाण्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे, की सोमवार, दि. ६ जुलै २०२६ रोजी काही अज्ञात व्यक्तींनी विविध 'फेक ई-मेल आयडीं'चा वापर करून अमळनेरमधील अनेकांना संबंधित महिला अधिकाऱ्याचे वैयक्तिक फोटो, कथित चॅट तसेच बदनामीकारक मजकूर 'ई-मेल'द्वारे




पाठविला. या प्रकारामुळे संबंधित अधिकारी दाम्पत्याची, त्यांच्या कुटुंबाची तसेच सामाजिक व व्यावसायिक प्रतिष्ठेची गंभीर हानी होत आहे. त्यामुळे संबंधित फेक ई-मेल आयडींचे आयपी अॅड्रेस, ई-मेल हेडर, सर्व्हर लॉग तसेच इतर तांत्रिक बाबींची तपासणी करून ई-मेल पाठविणाऱ्या व्यक्तींचा शोध घ्यावा, तसेच माहिती-तंत्रज्ञान अधिनियम (आयटी अॅक्ट) आणि भारतीय न्यायसंहिता (बीएनएस)मधील लागू तरतुदींनुसार गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करावी.

यासोबतच भविष्यात अशा प्रकारे कोणाच्याही वैयक्तिक आयुष्याशी, प्रतिष्ठेशी आणि कुटुंबाशी खेळ करणाऱ्या व्यक्तींना कायद्याचा कठोर धाक बसावा, यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. श्री. ठाकूर यांनी या तक्रारीसोबत कथित चॅटचे स्क्रीनशॉट, प्रसारित करण्यात आलेले फोटो, फेक ई-मेलचा स्क्रीनशॉट, संबंधित ई-मेलच्या सीसी/रिसिपियंट लिस्टचे स्क्रीनशॉट तसेच इतर उपलब्ध डिजिटल पुरावे जोडले असल्याचे नमूद केले आहे. या सर्व पुराव्यांचे फॉरेन्सिक परीक्षण करून संबंधित आरोपींचा शोध घेऊन त्यांच्यावर तातडीने कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी जळगाव, उपविभागीय पोलीस अधिकारी (अमळनेर विभाग) आणि पोलीस निरीक्षक, अमळनेर पोलीस ठाणे यांनाही माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीसाठी देण्यात आल्या आहेत.


अमळनेर : नगरसेवक श्रीराम भगवान चौधरी (आबा) यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना दै. 'ग्लोबल महातेज'चे कार्यकारी संपादक भरत पाटील, मार्केटिंग मॅनेजर शरद कुलकर्णी, खैरनार लॅबरोटरीचे संचालक उदय खैरनार, साखर व्यापारी महेश कोठावदे, सेवानिवृत्त मंडलाधिकारी पी. व्ही. पाटील.

# जळगाव, नंदुरबारमार्गे उधना-अमरावती रेल्वेगाडी धावणार

## हालचालींना वेग; पाठपुरावा निर्णायक टप्प्यात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : खानदेश आणि विदर्भातील रेल्वे प्रवाशांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या उधना-अमरावती विशेष रेल्वेच्या मागणीला आता गती मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. धरणगाव तालुका प्रवासी मंडळाने पश्चिम रेल्वे प्रशासनाकडे आठवड्यातून तीन दिवस उधना-अमरावती विशेष रेल्वे सुरू करण्याची मागणी केली असून, या प्रस्तावाची रेल्वे प्रशासनाने सकारात्मक दखल घेत कार्यवाही सुरू केली आहे. त्यामुळे येत्या काळात या विशेष रेल्वेबाबत अनुकूल निर्णय होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सध्या २०९२५/२०९२६ सुरत-अमरावती सुपरफास्ट एक्स्प्रेस ही रेल्वे दररोज चालविणे शक्य नसल्याने तिच्या वेळापत्रकातील उर्वरित दिवसांमध्ये इतर गाड्यांची वाहतूक केली जात आहे. या पार्श्वभूमीवर विद्यमान वेळापत्रकात आवश्यक बदल करून उर्वरित तीन दिवस उधना-अमरावती विशेष रेल्वे सुरू करण्याचा प्रस्ताव धरणगाव तालुका प्रवासी मंडळाने पश्चिम रेल्वेकडे सादर केला आहे. या प्रस्तावामुळे विद्यमान रेल्वे मार्गावर अतिरिक्त ताण न आणता प्रवाशांना नवीन सुविधा उपलब्ध करून देता येईल, असा दावा मंडळाकडून करण्यात आला

पान २ वर

रील्स बहाद्दरांना जळगाव पोलिसांचा दणका -पान २

# सप्तशृंगी देवीचे मंदिर ९ जुलैपर्यंत बंद!

## गडावर घडणाऱ्या 'त्या' गोष्टींनी वाढविली धास्ती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हवामान खात्याने वर्तविलेल्या अंदाजानुसार नाशिक जिल्ह्यातील प्रसिद्ध शक्तीपीठ असलेल्या सप्तशृंग गड आणि परिसरात मंगळवारी (७ जुलै) सकाळपासूनच मुसळधार पाऊस सुरू आहे. सतत सुरू असलेल्या या पावसामुळे गडाच्या घाटात दरडी आणि दगड कोसळण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने भाविकांच्या सुरक्षेचा उपाय म्हणून एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. सप्तशृंगी देवीचे मंदिर पुढील तीन दिवसांसाठी (७ जुलै ते ९ जुलै) दर्शनासाठी बंद ठेवण्यात आले आहे. तसेच गडाकडे जाणारा घाट रस्ताही सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी तीन दिवस पूर्णपणे बंद करण्यात आला आहे.

### घाटाच्या पायथ्याशी पोलिसांचा बंदोबस्त


धोकादायक परिस्थिती लक्षात घेता पोलीस प्रशासनाने तातडीने पावले उचलली आहेत. गडाच्या पायथ्याशी पोलिसांनी चोख बॅरिकेडिंग केले असून घाट रस्त्याने वर जाणारी सर्व वाहतूक थांबवण्यात आली आहे. या ठिकाणी २४ तास पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे, कोणत्याही वाहनाला गडावर जाण्याची परवानगी नाही. केवळ आपत्कालीन सेवांनाच या काळात मुभा असणार आहे.

### प्रशासनाचे भाविकांना नम्र आवाहन

पावसाचा जोर आणि डोंगरातून दगड गोठण्याची शक्यता पाहता, पुढील तीन दिवस भाविकांनी सप्तशृंग गडावर येणे पूर्णपणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

### नाशिक, त्र्यंबकेश्वर परिसरातील पर्यटकांची विशेष खबरदारी घ्या : फडणवीस

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (६ जुलै) सांगितले होते, की अरबी समुद्रावर तयार होत असलेल्या तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रामुळे नाशिक जिल्ह्याच्या बऱ्याचशा भागात मंगळवार, दि. ७ जुलै रोजी ढगफुटीसदृश पाऊस होण्याची दाट शक्यता आहे. हा पाऊस बऱ्यापैकी त्र्यंबकेश्वर आणि आजूबाजूच्या परिसरात पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली असून सुमारे ३०० मिलिमीटर पाऊस अपेक्षित आहे. अशा परिस्थितीत नाशिक जिल्हा प्रशासनाने सज्ज राहून सखल भागात पाणी साचणार नाही, यासाठी उपाययोजना कराव्यात. कुठेही जीवितहानी होणार नाही, याबाबतही दक्ष राहावे. ही परिस्थिती लक्षात



घेता नाशिक आणि त्र्यंबकेश्वर परिसरात असलेल्या पर्यटकांच्या सुरक्षेसाठी विशेष खबरदारी घेण्यात यावी. बंद होऊ शकणारे रस्ते, दरडी कोसळण्याची ठिकाणी अशा सर्वंकष बाबींचा विचार करून पर्यटकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात यावे. पुढील काही दिवस त्र्यंबकेश्वर परिसरामध्ये पर्यटकांनी जाऊ नये, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले आहे.

## संपादकीय

### पाऊस आला धावून, घोषणा गेल्या वाहून!

अनेक भागांमध्ये पावसाचे आगमन आता झालेले आहे. त्यामुळे राज्यातील बहुतांश भागातील शेतकरी आता खऱ्या अर्थाने सुखावला आहे. लावलेल्या खरिपाच्या पेरण्या आता शेतकरी लगबगीने पूर्ण करतो आहे. काही भागांत अजूनही पुरेसा पाऊस जरी पोहोचला नसला, तरी आठ दिवसांपूर्वी जे निराशाजनक आणि चिंताजनक चित्र होते ते आज राहिलेले नाही. चार-आठ दिवसांतील हा पाऊस पाच दोन टक्के का असेना, परंतु शेतीला आणि पिण्याच्या पाण्याला सहाय्यभूत ठरतो आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही मुंबई आणि परिसरामध्ये धो-धो पाऊस कोसळला. जूनमध्ये मुंबईसह राज्यात ४० ते ४५ टक्के पावसाचा तुटवडा नोंदविला गेला. आता ज्या पद्धतीने पाऊस अनेक ठिकाणी हजेरी लावतो आहे असेच प्रमाण जर पुढच्या दोन-तीन आठवडाभर राहिले तर मुंबईसह राज्याची पिण्याच्या पाण्याची समस्या ५० टक्क्यांनी संपुष्टात येईल. वेधशाळांच्या अंदाजाप्रमाणे १५ जुलैनंतर पाऊस पुन्हा विश्रांती घेण्याची शक्यता व्यक्त झालेली आहे. मात्र, साधारण दरवर्षीचा अनुभव लक्षात घेता जुलै आणि ऑगस्टच्या पहिल्या दोन आठवड्यांत पाऊस आपला सगळा अनुशेष भरून काढतो. सरासरीपेक्षा जास्त पाऊस होण्याचा प्रकार जुलैतच पाहायला मिळत असतो. कोकण-मुंबई परिसरामध्ये जुलैतील पावसाचा विक्रम अनेकवेळेला नोंदविला गेला आहे. दरवर्षीपेक्षा १५-२० टक्के पाऊस कमी होईल. हा अंदाज गृहित धरून सध्या कोसळत असलेल्या पावसाच्या पाण्याचा अधिकाधिक साठा करणे हाच पुढच्या वर्षभरासाठीचा प्रभावी उपाय ठरतो. दुर्दैवाने पाऊस जसा धो-धो कोसळतो त्याचे पाणी चारही दिशांनी वाहून जाते. तसाच प्रकार सरकारच्या घोषणांचा होतो. पावसासंबंधीचा किंवा जलसिंचनासंदर्भातल्या घोषणांचा धो-धो पाऊस पडतो आणि या घोषणादेखील पावसाच्या पाण्यात वाहून जातात. पावसाळा संपला, की अगदी पुढच्या महिना-दीड महिन्यातच अनेक शहरांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होते. आज महाराष्ट्रात ज्या ज्या ठिकाणी महापालिका आहेत त्या सगळ्या ठिकाणी पाण्याची महाटंचाईच हमखासपणे पाहावयास मिळते.

राज्याची राजधानी असलेली मुंबई ही खरेतर पावसाचीदेखील राजधानी म्हणायला हवी. परंतु दिल्ली ही देशाची राजधानी आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. या दोन्ही राजधान्यांमध्ये समस्यांचे प्रमाणही प्रचंड आहे. गेल्या काही वर्षांपासून प्रदूषणाबरोबरच या दोन्ही राजधान्यांमध्ये शुद्ध पाण्याचा पुरवठा होऊ शकत नाही आणि दोन्ही राजधान्यांमध्ये पावसाळ्यामध्ये वाहतूक कोंडी किंवा सखल भागात पाणी साचण्याचे प्रकार समान पद्धतीने पाहायला मिळतात. अर्थात मुंबईत पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या समस्यांचा विक्रम कोणतेच महानगर मोडू शकत नाही. मर्यादित भूभागावर तुडूंब लोकसंख्या असलेल्या या महानगरीला आता तुडूंब समस्यांचा दर पावसाळ्यात सामना करावा लागतो. गेल्या चार-पाच दिवसांत मुंबई आणि परिसरात मुसळधार पाऊस झाला. कदाचित जुलैत जेवढा पाऊस पडायला हवा त्याच्या ५० टक्के पाऊस या तीन-चार दिवसांतच पडून गेला असण्याची शक्यता आहे. मुंबईत पडणारा पाऊस हा एकाअर्थी बिनकामाचा पाऊस ठरतो. कारण या पाण्याचा ना शेतीसाठी उपयोग होतो ना पिण्याच्या पाण्यासाठी. तो साठवला जातो. एवढा पाऊस पडतो तो सगळा पुन्हा समुद्राला जाऊन मिळतो. मात्र, या तुडूंब पावसाचे तुडूंब तडाखे मुंबईला दरवर्षी सोसावे लागतात. गेल्या दहा वर्षांत नवनवीन समस्यांनी त्यात भर घातली आहे. त्यात मॅनहोलमध्ये पडून मृत्यू होणे, झाडे किंवा झाड्यांच्या फांद्या कोसळून जीव गमावण्याची वेळ येणे, ठिकठिकाणी असलेले अगडबंब जाहिरातींचे फलक कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता असते. आणि हा अपघाताचा प्रकार पाच-दहा जणांचे बळी घेणारा म्हणावा लागतो. मोडकळीस आलेल्या किंवा जुन्या जीर्ण इमारतींचे कोसळणे, हे तर मुंबईच्या पावसाळ्याचे एक अविभाज्य लक्षण असते.

सरकारने या सगळ्या प्रकारांबाबत कितीही सावधगिरीची उपाययोजना केली तरी ती पुरेशी ठरूच शकत नाही. कारण प्रचंड लोकसंख्येचा दबाव या महानगरीवर येतो आहे. आणि तो आता सहन करण्यापलिकडे गेल्याचे याही पावसाळ्यातून सिद्ध झाले आहे. राज्यातील पाणीटंचाईचा प्रश्न केवळ पावसाळ्यातील पाण्यातून सुटू शकेल अशी आज तरी स्थिती नाही. कारण गेल्या पंधरा-वीस वर्षांत राज्यात एकही नवीन जलसिंचन प्रकल्प अस्तित्वात आलेला नाही. कोकणातील ज्यादा पावसाचे पाणी कोयना धरणात आणण्यासंदर्भात दरवर्षी घोषणा होत राहते किंवा समुद्राच्या पाण्याचे काही प्रमाणात गोड पाणी निर्माण करण्याचा प्रकल्पही असाच पाच-दहा वर्षांपूर्वी मंजूर केला गेला. परंतु अजूनही यासारखे अनेक प्रकल्प रखडल्याचे पाहायला मिळते. मोठा गाजावाजा करून सुरू झालेली जलयुक्त शिवार योजना घोषणांच्याच महापुरात वाहून गेल्याचे म्हणावे लागते. आज राज्यातल्या एकाही गावात चोवीस तास पाणी मिळू शकत नाही. केंद्र सरकारच्या मदतीने 'हर घर जल आणि नल' अशी योजना सुरू झाली. परंतु महाराष्ट्रात 'जलही नाही आणि नलही नाही' अशी परिस्थिती आहे. नाशिकला गोदावरीसारखी सर्वात मोठी नदी लाभली, पण या महानगराची पाण्याची गरज सरकार भागवू शकलेले नाही. यंदाच्या कुंभमेळ्याला शाही स्नानापुरते तरी पाणी गोदावरीत असेल की, नाही याबद्दलही आता शंका वाटू लागली आहे. पुण्यासारख्या महानगराला मुळा मुठासारख्या दोन नद्या लाभल्या असून, पाण्याची तीव्र टंचाई दरवर्षी निर्माण होत असते. पुण्यात काय उणे असे आपण म्हणतो. परंतु पाण्याच्याबाबतीत 'मुळातच नाही तर मूठेत कुठून येणार' अशी तेथील पाण्याची परिस्थिती आहे. खरेतर राज्य सरकारच्या योजना मुळातच नाही. म्हणूनच आज पाऊस पडूनही पाण्याची समस्या कायम राहते.

## उधना-अमरावती रेल्वेगाडी धावणार

पान १ वरून : आहे. या मागणीसाठी जळगावच्या खासदार स्मिताताई वाघ यांनीही रेल्वे मंत्रालय तसेच पश्चिम रेल्वे प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे. खानदेश आणि विदर्भातील प्रवाशांच्या सोयीसाठी ही रेल्वे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी विविध बैठका आणि पत्रव्यवहारातून प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे. त्यांच्या पाठपुराव्यामुळेच प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचे मानले जात आहे. उधना, नंदुरबार, अमळनेर, धरणगाव, जळगाव, भुसावळ, मलकापूर, अकोला आणि अमरावती या मार्गावरील हजारो प्रवासी या निर्णयाची प्रतीक्षा करीत आहेत. गुजरातमध्ये रोजगार, उद्योग-व्यवसाय आणि शिक्षणासाठी वास्तव्यास असलेल्या खानदेश व विदर्भातील नागरिकांना या रेल्वेचा मोठा लाभ होणार आहे. तसेच व्यापारी, विद्यार्थी, नोकरदार, रुग्ण आणि ज्येष्ठ नागरिकांसाठीही प्रवास अधिक सुलभ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पश्चिम रेल्वे प्रशासनाने प्रस्तावाची सकारात्मक दखल घेतल्याने उधना-अमरावती विशेष रेल्वे सुरू होण्याबाबत आशावाद निर्माण झाला आहे. रेल्वे प्रशासनाकडून तांत्रिक आणि कार्यान्वयनाच्या बाबींचा अंतिम आढावा घेतल्यानंतर यासंदर्भात निर्णय जाहीर होण्याची शक्यता असून, खानदेश आणि विदर्भातील रेल्वे प्रवाशांच्या दीर्घकालीन मागणीला अखेर न्याय मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# रील्स बहाद्दरांना जळगाव पोलिसांचा दणका

## थेट मुख्यालयात बोलावून दिला कायद्याचा डोस

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : सोशल मीडियावर झटपट प्रसिद्धी मिळविण्याच्या हव्यासापोटी गुन्हेगारीचे उदात्तीकरण करणारे, शस्त्रांचे प्रदर्शन करून भाईगिरी मिरवणारे आणि वाहतूक नियमांची ऐशीतैशी करून जीवघेणी स्टंटबाजी करणाऱ्या रील्स बहाद्दरांना जळगाव पोलिसांनी चांगलाच इंगा दाखविला आहे. महिलांचा अवमान करणाऱ्या आणि समाजात दहशत निर्माण करणाऱ्या अशा आक्षेपार्ह रील्सची गंभीर दखल घेत जळगाव जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार, दि. ७ जुलै रोजी जिल्ह्यात 'सायबर पॅट्रोलिंग'ची मोठी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत हुल्लडबाजांची धरपकड करून त्यांना थेट पोलीस मुख्यालयात आणत कायद्याचा कडक डोस देण्यात आला.

पोलिसांच्या म्हणण्यानुसार अशा प्रकारचे व्हिडिओ युवकांवर विपरीत परिणाम करत असून गुन्हेगारी आणि नियमभंगाला प्रोत्साहन देतात. स्टंटबाजीमुळे अपघाताचा धोका वाढतो, तर महिलांचा अवमान करणारी सामग्री समाजात चुकीचा संदेश पोहोचवते. त्यामुळे अशा आशयाच्या रील्सवर लक्ष ठेवून संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यात येत आहे. पोलिसांच्या या धडक कारवाईचा उद्देश केवळ दंडात्मक कारवाई करणे एवढाच नव्हता, तर तरुणांमध्ये कायद्याबद्दल आदर निर्माण करणे आणि त्यांना गुन्हेगारीच्या दलदलीत जाण्यापासून परावृत्त करणे हा होता.

ही मोहीम पोलीस अधीक्षक धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड आणि त्यांच्या पथकाने सायबर पॅट्रोलिंगद्वारे संबंधितांची ओळख पटवून त्यांना कायद्याची जाणीव करुन दिली. सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर करावा, समाजविघातक किंवा कायद्याचे उल्लंघन करणारा मजकूर व व्हिडिओ प्रसारित करु नयेत, अन्यथा कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही जळगाव पोलिसांनी दिला आहे.



*अमळनेर : जळगाव जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार, दि. ७ जुलै रोजी जिल्ह्यात 'सायबर पॅट्रोलिंग'ची मोठी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत हुल्लडबाजांची धरपकड करून त्यांना थेट पोलीस मुख्यालयात आणत कायद्याचा कडक डोस देण्यात आला.*




*अमळनेर : येथील पी.बी.ए. इंग्लिश मीडियम स्कूलचे विद्यार्थी आरव विठ्ठल पाटील व श्रावणी हेमंत भामरे यांनी शिष्यवृत्ती, ऑलिम्पियाड परीक्षांत यश मिळविल्याने त्यांचा गुणगौरव सन्मान करताना मुख्याध्यापक देवरे व शिक्षिका.*

## 'पीबीए इंग्लिश मीडियम'च्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती, ऑलिम्पियाड परीक्षांत यश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पी.बी.ए. इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, पुणे यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या राज्य शिष्यवृत्ती परीक्षा तसेच

इंडियन टॅलेन्ट ऑलिम्पियाड परीक्षेत चमकदार कामगिरी करत यश संपादन केले. या स्कूलचे दोन विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले असून, त्यांना ही शिष्यवृत्ती येणाऱ्या काही दिवसांत प्राप्त होणार आहे. स्कूल व समस्त अमळनेर नगरीसाठी ही सन्मानाची व गौरवाची बाब ठरल्याने समाजाच्या सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या परीक्षेसाठी स्कूलतर्फे एकूण २२ विद्यार्थी प्रविष्ट होते. त्यातील १४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, शहरी गट विभागात श्रेणीमध्ये उत्तीर्ण झालेले तसेच शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी आरव विठ्ठल पाटील व श्रावणी हेमंत भामरे (दोन्ही इयत्ता पाचवी) या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सन्मान स्कूलतर्फे नुकताच करण्यात आला.

तसेच इंडियन टॅलेन्ट ऑलिमपियाड परीक्षेतही श्रावणी भामरे राज्यातून १६ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली. तिला स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र आणि रोख एक हजार रुपये मुख्याध्यापक जे. एस. देवरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. त्याचबरोबर यश चौधरी (इयत्ता पाचवी) यालाही स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरवान्वित करण्यात आले .

शाळेचे चेअरमन डॉ. संदेश गुजराथी, मुख्याध्यापक देवरे, पर्यवेक्षक महेश माळी, पर्यवेक्षिका सौ. मीनाक्षीताई बारी, सौ. स्वातीताई माळी, पी. व्ही. महाजन, वाय. पी. ओवे, व्ही. एस. अमृतकर, सौ. डिंपलताई देसाई, प्रशांत वंजारी, एस. एस. पारधी यांच्यासह समस्त शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सदर परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन मार्गदर्शन लाभले.

## सोने, चांदीत सलग दुसऱ्या दिवशी घसरण

### सणासुदीसाठी दागिने खरेदीच्या विचारात असलेल्या ग्राहकांना दिलासा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळगाव येथील सुवर्ण बाजारपेठेत सलग दुसऱ्या दिवशी मंगळवार, दि. ७ जुलै रोजी सकाळी बाजारपेठ उघडल्यावर सोने आणि चांदीच्या दरात घसरण नोंदविण्यात आली. त्यामुळे आगामी सुणासुदीसाठी दागिने खरेदीच्या विचारात असलेल्या ग्राहकांना बऱ्यापैकी दिलासा मिळाला.

जागतिक आर्थिक घडामोडी, अमेरिकेची मध्यवर्ती बँक असलेल्या यूएस फेडरल रिझर्व्हच्या आगामी धोरणात्मक निर्णयांबाबतची अनिश्चितता आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील चढ-उतार यामुळे देशांतर्गत सराफा बाजारात अस्थिरतेचे वातावरण कायम आहे. मंगळवारीही सोन्याच्या दरात घसरण झाली असून, चांदीच्या दरातही लक्षणीय नरमाई दिसून आली आहे. त्यामुळे सोने-चांदी खरेदीची योजना करणाऱ्या ग्राहकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. जुलैच्या सुरूवातीला सोन्याच्या किमती तुलनेने कमी होत्या. मात्र, पहिल्याच आठवड्यात आंतरराष्ट्रीय बाजारातील घडामोडींमुळे सोन्याच्या दरात लक्षणीय वाढ झाली होती. त्यानंतर आता पुन्हा एकदा बाजारात नफा वसुली, डॉलरमधील चढ-उतार आणि जागतिक गुंतवणूकदारांच्या सावध भूमिकेमुळे सोन्याच्या किमती नरमल्या आहेत.

दुसरीकडे चांदीच्या दरामध्ये सोन्याच्या तुलनेत अधिक घसरण झाली आहे. औद्योगिक क्षेत्रातील मागणीतील बदल, जागतिक बाजारातील मंदावलेली खरेदी आणि गुंतवणूकदारांच्या बदलत्या भूमिकेमुळे चांदीवर अधिक दबाव दिसून येत आहे. परिणामी, चांदीच्या दरात लक्षणीय घसरण नोंदविण्यात आली. दरम्यान, जागतिक बाजाराचे लक्ष आता यूएस फेडरल रिझर्व्हच्या जूनमध्ये झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताकडे लागले आहे. हे इतिवृत्त बुधवार, दि. ८ जुलै रोजी जाहीर होणार असून, त्यातून अमेरिकेतील व्याजदर धोरणाबाबत महत्त्वाचे संकेत मिळण्याची शक्यता आहे. महागाई अजूनही फेडच्या दोन टक्के लक्ष्यापेक्षा अधिक असल्याने यावर्षी किमान एकदा व्याजदरात वाढ होण्याची शक्यता तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे.

**सोने, चांदीच दर किती कमी झाले?**

जळगावमधील सुवर्ण बाजारपेठेत सोमवार, दि. ६ जुलै रोजी दिवसभरात १३३९ रुपयांची घट झाल्याने २४ कॅरेट सोन्याचे दर तीन टक्के जीएसटीसह प्रति १० ग्रॅम एक लाख ४९ हजार ७६२ रुपयांपर्यंत खाली आले होते. मंगळवार, दि. ७ जुलै रोजी सकाळी बाजारपेठ उघडल्यावर आणखी ७२१ रुपयांची घट झाल्याने सोने जीएसटीसह प्रति १० ग्रॅम एक लाख ४९ हजार ४१ रुपयांपर्यंत घसरले. त्यामुळे सोन्याच्या दरात दोन दिवसांत २,०६० रुपयांची घट झाल्याची नोंद घेतली गेली. तर चांदीच्या दरात

सोमवार, दि. ६ जुलै रोजी दिवसभरात १,०३० रुपयांची घट झाल्याने चांदीचे दर तीन टक्के जीएसटीसह प्रति किलो दोन लाख ४३ हजार ८० रुपयांपर्यंत खाली आले होते. मंगळवार, दि. ७ जुलै रोजी सकाळी बाजारपेठ उघडल्यावर आणखी ३,०९० रुपयांची घट झाल्याने चांदी जीएसटीसह प्रतिकिलो दोन लाख ३९ हजार ९९० रुपयांपर्यंत घसरली. त्यामुळे चांदीच्या दरात दोन दिवसांत ४,१२० रुपयांची घट झाल्याची नोंद घेतली गेली.

## आशा पारेख यांच्या प्रेमात वेडा झाला चाहता; चक्क अभिनेत्रीच्या घराबाहेर मांडला तळ


### शेवटी आली तुरुंगात जाण्याची वेळ, नेमके काय असे घडले?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आशा पारेख यांनी ६० आणि ७० च्या दशकात हिंदी चित्रपटसृष्टीवर राज्य केले. आशा पारेख यांना सिनेमातील सर्वांत सुंदर आणि प्रतिष्ठित अभिनेत्रींपैकी एक मानले जाते. म्हणूनच आजही त्यांचा मोठा चाहता वर्ग आहे. मात्र, काही वेळेस चाहते अशा गोष्टी करतात की ज्यामुळे अभिनेत्री अडचणीत येतात. आशा पारेख यांच्या बाबतीतही असेच काहीसे घडले होते. हे त्यांनी एका मुलाखतीमध्ये सांगितले.

**अभिनेत्रीने सांगितला चाहत्याचा किस्सा**

आशा पारेख म्हणाल्या, की 'एक चिनी माणूस माझ्या घराबाहेर राहायला आला. तो माझ्या हालचालींवर आणि रोजच्या कामांवर सतत नजर ठेवायचा. त्याला टाळण्यासाठी मी माझ्या गाडीतून गुपचूप बाहेर पडायचे. जेव्हा शेजाऱ्यांनी त्याला जायला सांगितले तेव्हा त्याने शेजाऱ्यांना चाकू दाखवून म्हटले, की मी तुम्हाला



ठार मारेन, मला आशाशी लग्न करायचे आहे.

**अभिनेत्रीने त्याला तुरुंगात पाठविले**

त्या चाहत्याच्या वेडामुळे आशा पारेख यांना धक्का बसला होता. त्यांना स्वतःच्या घरात भीती वाटत होती आणि काय करावे हे त्यांना सुचत नव्हते. शेवटी आशा यांनी तत्कालीन मुंबई पोलीस आयुक्तांना फोन केला आणि त्या चाहत्याला तुरुंगात पाठवले. याबाबत अभिनेत्री म्हणाली, 'मी पोलीस आयुक्तांना फोन केला. त्यांनी त्याला तुरुंगात टाकले. त्या चाहत्याने मला तुरुंगातूनही पत्र पाठविलेले, 'तू मला तुरुंगात टाकले आहेस. मला बाहेर काढ.' मी म्हटले, आता, मीच तुला आत टाकले आहे. तर मी तुला बाहेर कसं काढू?' २०१७ मध्ये फिल्मफेअरला दिलेल्या एका मुलाखतीमध्ये आशा पारेख यांनी हा किस्सा सांगितला होता.

आशा पारेख यांचं चित्रपट निर्माते नासिर हुसेन यांच्यावर प्रेम होतं. पण त्यांनी कधीही लग्न केलं नाही. त्या आयुष्यभर सिंगल राहिल्या. २०२० मध्ये, आशा पारेख यांना दादासाहेब फाळके पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. आशा पारेख यांनी 'फिर वही दिल लाया हूँ', 'जब प्यार किसी से होता है', 'तीसरी मंझील', 'बहारों के सपने', 'प्यार का मौसम' आणि 'कारवां' यांसारख्या अनेक चित्रपटांमध्ये काम केलं आहे.

## लसूण खाल्ल्याने ब्लड शुगर झपाट्याने कमी?

### काय आहे खाण्याची पद्धत? जाणून घ्या...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

लसणात अँटिऑक्सिडंट, खनिजे आणि जीवनसत्त्वे भरपूर प्रमाणात असतात; त्यामुळे एखाद्या व्यक्तीला जास्तीत जास्त लाभ देण्यासाठी अल्प प्रमाणातही पुरेसे आहे. मधुमेह हा एक सामान्य आजार बनत चालला आहे. या आजारावर अद्याप कोणताही इलाज सापडलेला नाही. पण काही आयुर्वेदिक आणि घरगुती उपायांनी रक्तातील साखर मात्र नियंत्रित ठेवता येते. मधुमेह असलेल्या लोकांच्या आहारावर अनेक निर्बंध आहेत. अशा परिस्थितीत माणसाला आपला आहार अत्यंत काळजीपूर्वक निवडावा लागतो. त्याच वेळी, काही लोकांचा असा विश्वास आहे की मधुमेहींनी लसणाचे नियमित सेवन केले पाहिजे. याने रक्तातील साखर नियंत्रित राहण्यास मदत होते.

डॉ. पाखी शर्मा, माजी जनरल फिजिशियन, विमलया हॉस्पिटल, बेंगळुरू यांच्याकडून, जाणून घेऊया मधुमेहींसाठी लसूण खाणे सुरक्षित आहे का? मधुमेहाच्या रुग्णांनी किती प्रमाणात लसूण खावे?

डॉ. पाखी यांच्या मते लसणामध्ये कार्बोहायड्रेट, फॅट, प्रथिने, जीवनसत्व आणि खनिजे, व्हिटॅमिन बी१, व्हिटॅमिन बी २, व्हिटॅमिन बीउ, व्हिटॅमिन बी५, व्हिटॅमिन बी६, व्हिटॅमिन बी९, व्हिटॅमिन सी, कॅल्शियम, आयर्न, मॅग्नेशियम, मॅगनीज, फॉस्फरस, पोटॅशियम सोडियम, सेलेनियम यांसारखे पोषक घटक आढळतात. लसणामध्ये मजबूत अँटीबॅक्टीरियल आणि अँटीफंगल गुणधर्म असतात. झिंक, फॉस्फरस, सेलेनियम, कॅल्शियम आणि लोह यांसारख्या अनेक खनिजांनेही ते समृद्ध आहे. त्यात 'ॲलिसिन' नावाचे उत्कृष्ट गंधकयुक्त संयुग देखील असते, जे तिखट चव आणि वासासाठी जबाबदार असते.



हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# टक्कल केल्याने केस दाट येतात?

## पांढरे केस उपटल्याने आणखी पांढरे केस येतात? जाणून घ्या ५ गैरसमज आणि वस्तुस्थिती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

केस आपल्या सौंदर्यात भर घालतातच, पण त्याचबरोबर आपल्या टाळूचे ऊन, थंडी आणि धुळीपासूनही संरक्षण करतात. निरोगी केस हे चांगला आहार, पोषण, संप्रेरकांचा (हार्मोन्स) समतोल आणि उत्तम आरोग्याचे लक्षणही मानले जाते. केस गळण्याची समस्या पूर्वी प्रामुख्याने मध्यम वयानंतर दिसायची. परंतु आता अनेकांना वयाच्या विशी-तिशीतच या समस्येला सामोरे जावे लागत आहे.

केवळ पुरुषच नाही, तर महिला, तरुण, प्रसूतीनंतरच्या माता, वृद्ध आणि काही वेळा लहान मुलांनाही केस गळतीचा त्रास होतो. यामुळे बाजारात 'आठवडाभरात केस वाढतील', '१०० टक्के गॅरंटी ', 'टक्कलावर कायमचा उपाय' अशा अनेक जाहिराती दिसून येतात. पण यापैकी अनेक दाव्यांना कोणताही ठोस असा वैज्ञानिक पुरावा किंवा आधार नसतो.

केस गळणे हा नेहमीच एखादा आजार असलेच असे नाही. अनेकवेळा ते शरीरात सुरू असलेल्या दुसऱ्या एखाद्या समस्येचे लक्षण असू शकते. त्यामुळे केस गळण्यामागचे नेमके कारण शोधणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**केस कसे वाढतात?**

प्रत्येक केस एका छोट्या केसकूपातून (हेअर फॉलिकल) वाढतो. प्रत्येक केसाच्या वाढीचा जीवनप्रवास साधारणपणे ३ टप्प्यांतून होतो.

**१) ॲनाजेन**

हा केसांच्या वाढीचा टप्पा आहे. ही अवस्था साधारण २ ते ७ वर्षे टिकते. आपल्या डोक्यावरचे साधारण ८५ ते ९० टक्के केस या टप्प्यात असतात.

**२) कॅटाजेन**

ही मधली अवस्था आहे. ती अल्प काळासाठी असते. या टप्प्यात केसांची वाढ मंदावते.

**३) टेलोजेन**

हा केसांच्या विश्रांतीचा टप्पा असतो. या टप्प्यानंतर केस गळून पडतात आणि त्याच्या जागी नवीन केस उगवतात. त्यामुळे दररोज ५० ते १०० केस गळणे हे पूर्णपणे नैसर्गिक आहे. याला आजार किंवा वैद्यकीय समस्या समजण्याची गरज नाही.

**केस गळण्याचे प्रकार आणि प्रमुख कारणे**

प्रत्येकामध्ये केस गळण्याची समस्या सारखी नसते.

**१) अँड्रोजेनेटिक अलोपेसिया**

केस गळतीचा हा सर्वात सामान्य प्रकार आहे. या स्थितीत पुरुषांमध्ये कपाळावरील केस मागे सरकणे, डोक्याच्या मध्यभागी म्हणजेच वरच्या भागातील केस विरळ होणे आणि हळूहळू टक्कल पडणे अशी लक्षणे दिसून येतात. महिलांमध्ये प्रामुख्याने डोक्याच्या मध्यभागी केस पातळ किंवा विरळ होतात. परंतु, महिलांमध्ये पूर्ण टक्कल पडण्याचे प्रमाण कमी असते. हा प्रकार प्रामुख्याने आनुवंशिक कारणे आणि हार्मोन्समधील बदलांमुळे होतो.

**२) टेलोजेन एफ्लुव्हियम**

या प्रकारात अचानक आणि नेहमीपेक्षा जास्त केस गळू लागतात. डेंग्यू, कोविड, टायफॉइड, मोठी शस्त्रक्रिया, प्रसूती किंवा तीव्र मानसिक तणावानंतर अनेकदा अशा केसगळतीची समस्या उद्भवते. अनेकवेळा अशा परिस्थितीनंतर ३ ते ६ महिन्यांत केस पुन्हा वाढू लागतात.

**३) ॲलोपेशिया एरियाटा**

हा एक शरीराच्या प्रतिकारशक्तीशी संबंधित आजार आहे. या आजारात शरीराची रोगप्रतिकारशक्ती केसांच्या मुळांवर (हेअर फॉलिकल्स) हल्ला करते. त्यामुळे डोक्यावर गोलाकार ठिकाणी केस गळून चट्टे पडतात. या प्रकरणांमध्ये काही जणांच्या भुवया आणि दाढीचे केसही गळू शकतात.

**४) ट्रॅक्शन अलोपेसिया**

केस सातत्याने खूप घट्ट बांधून ठेवल्यामुळे ही समस्या उद्भवते. घट्ट वेणी, घट्ट पोनीटेल किंवा हेअर एक्स्टेन्शन्स (उदा.- हेअरपीसेस) वापरल्यामुळे केस गळू शकतात.

**५) स्कारिंग अलोपेसिया**

ही समस्या दुर्मीळ असली तरी गंभीर असते. यात केसांची मुळं कायमस्वरुपी खराब होऊ शकतात. उपचाराला उशीर झाल्यास त्या ठिकाणी पुन्हा केस येत नाहीत. त्यामुळे अशी लक्षणं दिसल्यास त्वचारोगतज्ज्ञांचा त्वरीत सल्ला घेणे आवश्यक आहे. दररोज १०० पेक्षा जास्त केस गळत असतील, केस खूप विरळ होत असतील, टाळू (स्कॅल्प) दिसू लागला असेल, गोलाकार भागात केस गळत असतील किंवा भुवया व दाढीचे केसही गळत असतील, तर या समस्येकडे दुर्लक्ष करू नका. अशा वेळी त्वचारोगतज्ज्ञांचा (डर्मेटोलॉजिस्ट) त्वरित सल्ला घेणे योग्य आणि हिताचे ठरेल.

**डॉक्टर कोणत्या चाचण्या करतात?**

प्रत्येकाला सर्व तपासण्या किंवा चाचण्या करण्याची गरज नसते. लक्षणांनुसार डॉक्टर सीबीसी (कम्प्लिट ब्लड काऊंट), सीरम फेरिटिन, थायरॉईड, व्हिटॅमिन डी, व्हिटॅमिन बी १२, झिंक, हार्मोन्सच्या तपासण्या किंवा ट्रायकोस्कोपी (केस आणि टाळूची विशेष तपासणी) करण्याचा सल्ला देऊ शकतात. क्वचितप्रसंगी टाळूची बायोप्सीही केली जाते. या तपासण्यांच्या अहवालानुसार पुढील उपचार निश्चित केले जातात.



**सध्या कोणते उपचार उपलब्ध आहेत?**

केस गळण्याचे कारण काय आहे, यावरच त्याचे उपचार ठरतात.

**१) शरीरामध्ये पोषक** घटकांची कमतरता असेल, तर लोह (आयर्न), व्हिटॅमिन बी१२ आणि व्हिटॅमिन डी यांसारख्या घटकांची कमतरता भरून काढण्यासाठी उपचार केले जातात. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय विनाकारण व्हिटॅमिनच्या गोळ्या घेणे योग्य नाही.

**२) मिनॉक्सिडिल**

केसांच्या वाढीसाठी वापरल्या जाणाऱ्या औषधांमध्ये मिनॉक्सिडिलचा वापर मोठ्याप्रमाणावर केला जातो. पुरुष आणि महिलांमधील काही विशिष्ट प्रकारच्या केसगळतीवर हे औषध उपयुक्त ठरते. परंतु हे केवळ डॉक्टरांच्या सल्ल्यानेच घेतले पाहिजे.

**३) फिनास्टेराइड**

याचा वापर प्रामुख्याने पुरुषांमधील आनुवंशिक टक्कल पडण्याच्या समस्येसाठी केला जातो. हे औषध केवळ डॉक्टरांच्या सल्ल्याने आणि त्यांच्या देखरेखीखालीच घेतले पाहिजे.

**४) पीआरपी (प्लेटलेट-रिच प्लाझ्मा)**

या उपचारात रुग्णाच्या रक्तातून प्लेटलेट्स वेगळे करून ते एका विशेष पद्धतीने टाळूमध्ये इंजेक्शनद्वारे दिले जातात. काही लोकांसाठी हा उपचार उपयोगी ठरू शकतो. परंतु प्रत्येकाला एकसारखाच परिणाम मिळेल असे नाही.

**५) लो-लेव्हल लेसर थेरपी**

काही संशोधनांमध्ये याचे फायदे दिसून आले आहेत. पण हा उपचार प्रत्येकासाठी आवश्यक असतोच असे नाही.

**६) केस प्रत्यारोपण (हेअर ट्रान्सप्लांट)**

आनुवंशिक टक्कल असलेल्या काही लोकांसाठी हा एक चांगला पर्याय ठरू शकतो. हा उपचार फक्त अनुभवी प्लास्टिक सर्जन किंवा त्वचारोगतज्ज्ञांकडेच केला पाहिजे.

**सोशल मीडियावर दिसणारे उपचार खरे आहेत का?**

हल्ली यूट्यूब, इन्स्टाग्राम आणि फेसबुकवर शेकडो व्हिडिओ दिसतात. '७ दिवसांत केस येतील', 'या तेलाने टक्कल नाहीसे होईल', 'एका पानामुळे नवीन केस येतील' अशा अनेक जाहिराती वारंवार आपल्याला दिसतात. पण अशा दाव्यांना कोणताही वैज्ञानिक आधार नसतो. केस गळतीची कारणे वेगवेगळी असतात. त्यामुळे सर्वांना एकाच प्रकारचे औषध उपयोगी किंवा गुणकारी ठरत नाही.

**स्टिरॉइड लोशन्स धोकादायक असतात का?**

डॉक्टर फक्त विशिष्ट परिस्थितींमध्येच स्टिरॉइड्स लिहून देतात. पण मेडिकल दुकानातून स्वतःच ते विकत घेऊन महिनोन् महिने वापरल्यास त्वचा पातळ होणे, संसर्ग होणे आणि इतर दुष्परिणाम होण्याचा धोका जास्त असतो.

**केसांचे तेल किती उपयोगी आहे?**

खोबरेल तेल, बदामाचे तेल यांसारखी तेल टाळूला ओलावा देऊ शकतात आणि केस तुटण्यापासून काही प्रमाणात संरक्षण करू शकतात. परंतु आनुवंशिक टक्कल किंवा तीव्र प्रमाणात होणारी केसगळती पूर्णपणे बरी करू शकत नाहीत. केस प्रामुख्याने केराटिन नावाच्या प्रथिनापासून बनलेले असतात. त्यामुळे आहारात प्रथिने कमी असतील तर केस कमकुवत होण्याची शक्यता असते. त्यामुळे दैनंदिन आहारात अंडी, दूध, दही, मासे, चिकन (मर्यादित प्रमाणात), डाळी, मूग, सोया उत्पादनं, हिरव्या पालेभाज्या, बदाम, अक्रोड, तीळ, ताजी फळे आणि विविध रंगांच्या भाज्यांचा समावेश असावा.

**केस कसे धुवावेत?**

अनेकांना असे वाटते की रोज शॅम्पूने केस धुतल्याने केस गळतात, पण हे खरे नाही. हा एक गैरसमज आहे. साधारणपणे आठवड्यातून २ ते ३ वेळा केस धुणे पुरेसे असते. ज्यांना जास्त घाम येतो, ते गरजेनुसार अधिक वेळा केस धुवू शकतात. खूप गरम पाण्याने केस धुणे चांगले नाही. सौम्य शॅम्पू वापरणे चांगले असते. हेअर ड्रायर आणि स्ट्रेटनर वापरू शकता, पण अति उष्णता टाळावी. तसेच याचा रोज वापर करणे योग्य नाही. आवश्यकता असेल तर हीट प्रोटेक्शन म्हणजे उष्णतेपासून संरक्षण करणारी उत्पादने वापरावीत. केस ओले असताना जोरात विंचरू नका.

**गैरसमज आणि वस्तुस्थिती**

**गैरसमज १ :** दररोज शॅम्पू केल्याने केस गळतात.

**वस्तुस्थिती :** योग्य शॅम्पू वापरल्याने साधारणपणे कोणतीही हानी होत नाही.

**गैरसमज २ :** टक्कल केल्याने केस पुन्हा दाट येतात.

**वस्तुस्थिती :** याला कोणताही वैज्ञानिक आधार किंवा पुरावा नाही.

**गैरसमज ३ :** तेल लावल्याने टक्कल जाते किंवा केस येतात.

**वस्तुस्थिती** : नाही.

**गैरसमज ४ :** पांढरे केस मुळापासून उपटल्याने आणखी पांढरे केस येतात.

**वस्तुस्थिती :** केस उपटून किंवा मुळापासून उपटल्याने आजूबाजूच्या केसांचा रंग बदलत नाही.

**गैरसमज ५ :** प्रत्येकाला बायोटिनच्या गोळ्या आवश्यक असतात.

**वस्तुस्थिती** : बायोटिनची कमतरता फारच दुर्मीळ असते. तपासणीशिवाय सप्लिमेंट्स घेण्याची गरज नसते.

केस गळणे ही एक सामान्य समस्या आहे. परंतु प्रत्येकामध्ये त्याची कारणं वेगवेगळी असतात. काही लोकांमध्ये ही केवळ तात्पुरती समस्या असते, तर काहींच्या बाबतीत हार्मोन्समधील बदल, पोषक घटकांची कमतरता, थायरॉइडचे विकार किंवा आनुवंशिक कारणेही असू शकतात. म्हणून इंटरनेटवर दिसणाऱ्या प्रत्येक उपायावर विश्वास ठेवण्यापेक्षा समस्या दीर्घकाळ सुरू राहिली तर त्वचारोगतज्ज्ञांचा सल्ला घेणे सर्वांत योग्य ठरते. केस गळतीचे योग्य कारण ओळखून वैज्ञानिक पद्धतीने उपचार सुरू केल्यास अनेकांमध्ये ही गळती नियंत्रित करता येऊ शकते.

केसांच्या आरोग्यासाठी केवळ महागडे शॅम्पू, तेल किंवा सौंदर्योपचार पुरेसे नसतात. शरीर निरोगी असेल तर केसही निरोगी राहू शकतात. संतुलित आहार, पुरेशी झोप, मानसिक शांतता, डोक्याची/टाळूची स्वच्छता आणि गरज पडल्यास डॉक्टरांचा सल्ला घेणे- हीच दाट आणि निरोगी केसांची खरी गुपिते आहेत.

# इलायची की देशी, कोणती केळी आरोग्यासाठी जास्त फायदेशीर?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बाजारात केळी घेताना इलायची आणि देशी दोन्ही केळी पौष्टिक आहेत. मात्र, गरजेनुसार योग्य प्रकार निवडणे फायदेशीर ठरते.

इलायची केळीत कर्बोदके, जीवनसत्त्व अ, लोह, पोटॅशियम, फायबर आणि नैसर्गिक साखर भरपूर प्रमाणात आढळते.

नैसर्गिक साखरेमुळे इलायची केळी शरीराला झटपट ऊर्जा देण्यास आणि थकवा कमी करण्यास मदत करते.

पोटॅशियम मुबलक असल्यामुळे



हृदयाचे ठोके नियमित ठेवण्यास आणि रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत होते.

सोडियम कमी आणि पोटॅशियम जास्त असल्याने उच्च रक्तदाब असलेल्या व्यक्तींना इलायची केळी उपयुक्त ठरू शकते.

कॅल्शियम आणि पोटॅशियममुळे हाडे व दात मजबूत राहण्यास मदत होते.

फायबर आणि स्टार्चचे प्रमाण चांगले असल्याने पचनक्रिया सुधारण्यास आणि पोट निरोगी ठेवण्यास मदत मिळते.

पेक्टिन आणि विद्राव्य फायबरमुळे रक्तातील कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत होऊ शकते.

फॉलिक ॲसिड मुबलक असल्यामुळे गर्भधारणेदरम्यान आवश्यक रक्तनिर्मितीसाठी इलायची केळी उपयुक्त मानली जाते.

लोहाचे प्रमाण असल्यामुळे हिमोग्लोबिन वाढविण्यास आणि अशक्तपणाचा धोका कमी करण्यास मदत होते.

देशी केळीही फायबर, पोटॅशियम आणि नैसर्गिक पोषक घटकांनी समृद्ध असल्यामुळे दैनंदिन आहारासाठी उत्तम पर्याय आहे. इलायची असो किंवा देशी, ताजी आणि चांगल्या प्रतीची केळी नियमित प्रमाणात खाल्ल्यास शरीराला अनेक आरोग्यदायी फायदे मिळू शकतात.

# आयुष्यात सतत वाईटच घडत आहे?

## पण खरे कारण समजल्यावर तुम्हालाही बसेल धक्का; 'या' ५ गोष्टी देतात मोठे संकेत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजकाल तुमच्या आयुष्यात सगळे काही बदलल्यासारखे वाटत आहे का? कधी-कधी आपल्याला असे वाटते, की सगळ्या गोष्टी बिघडत आहेत. पण खरेतर त्या एका चांगल्या भविष्याची तयारी असते. जर तुम्हीही अशाच काही संकेतांमधून जात असाल, तर समजा तुमच्या आयुष्यात लवकरच काहीतरी खूप मोठे आणि चांगले घडणार आहे. येथे काही सोपे संकेत दिले आहेत. ज्यामुळे तुम्हाला समजेल की तुमच्या आयुष्यात काही मोठे होणार आहे.

**जुन्या गोष्टींमध्ये मन न लागणे**

कधी-कधी अचानक असे वाटते की ज्या मित्रांसोबत किंवा सवयींसोबत तुम्ही आनंदी होता आता त्यांच्यासोबत तुमचे जुळत नाही. याचा अर्थ तुम्ही वाईट झालात असा नाही, तर तुम्ही आतून पुढे गेले आहात आणि आता तुम्हाला काहीतरी नवीन हवे आहे.

**सगळे काही बिघडल्यासारखे वाटणे**

जेव्हा तुम्हाला वाटते की तुमचे काम, नाती किंवा पैसा- सगळेच विस्कटत चालले आहे, तेव्हा घाबरू नका. कधी-कधी जुन्या गोष्टी संपतात. कारण त्यांच्या जागी काहीतरी नवीन आणि चांगले निर्माण होणार असते.

**अचानक खूप एकटेपणा जाणवणे**

जेव्हा तुम्हाला गर्दीतही शांतता किंवा एकटेपणा जाणवतो, तेव्हा समजा की तुम्ही स्वतःला समजून घेण्याचा प्रयत्न करत आहात. हा एकटेपणा तुम्हाला कमकुवत नाही, तर आतून मजबूत बनवतो, जेणेकरून तुम्ही स्वतःचा आवाज ऐकू शकता.

**जुन्या चुका आठवणे**

अचानक भूतकाळातील चुका वारंवार आठवू लागल्या, तर काळजी करू नका. तुमचं मन जुन्या गोष्टी साफ करत आहे, जेणेकरून भविष्यात त्या चुका पुन्हा होऊ नयेत. हे तुम्हाला तयार करण्याचा एक मार्ग आहे.

**कोणत्याही कारणाशिवाय घाबरल्यासारखे वाटणे**

कधी-कधी सगळे ठीक असूनही मन अस्वस्थ राहते. हा संकेत असू शकतो की तुमच्या आयुष्यात बदलाची चाहूल लागली आहे. जसे वादळ येण्याआधी वातावरण बदलते, तसेच मोठ्या बदलाआधी मन अस्वस्थ होणे सामान्य गोष्ट आहे.

# ११ वीं में ३४ प्रतिशत और बी.टेक में २४ बार बैकलॉग लाने वाले समीर शर्मा बने आयपीएस

## यूपीएससी में हासिल की १८२ वीं रैंक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अक्सर हमारे समाज में यह मान लिया जाता है कि जो छात्र स्कूल या कॉलेज की पढ़ाई में पीछे रह जाते हैं, वे जिंदगी में कुछ बड़ा नहीं कर सकते। लेकिन कुछ लोग अपनी मेहनत और मजबूत इरादों से इस सोच को पूरी तरह बदल देते हैं। आईपीएस अधिकारी समीर शर्मा की कहानी आज देश भर के उन करोड़ों छात्रों के लिए एक बहुत बड़ी उम्मीद बनकर उभरी है, जो खुद को पढ़ाई में कमजोर मानते हैं। समीर शर्मा का यह सफर साबित करता है कि आपके बीते हुए कल के कम नंबर आपका आने वाला भविष्य तय नहीं कर सकते।



**जब स्कूल और कॉलेज में मिला असफलताओं का दौर**

समीर शर्मा बचपन से एक बहुत ही सामान्य छात्र थे। स्कूल के दिनों में उनका मन पढ़ाई में बहुत ज्यादा नहीं लगता था। १०वीं में उन्हें ५७% अंक मिले थे। उनकी शैक्षणिक जिंदगी का सबसे खराब दौर तब आया जब वे ११वीं कक्षा में थे। इस

सक्सेस स्टोरी

क्लास में उन्हें महज ३४ प्रतिशत अंक मिले थे, जिसे देखकर हर कोई हैरान था। १२वीं में उन्हें ६०% नंबर मिले।

इसके बाद जैसे-जैसे उन्होंने स्कूल पूरा किया और आगे इंजीनियरिंग (बी. टेक) में दाखिला लिया, तो मुश्किलें और बढ़ गईं। कॉलेज के दौरान उन्हें एक या दो नहीं, बल्कि पूरे २४ विषयों में बैकलाग का सामना करना पड़ा।

**ताने बने ताकत - १८ महीने में पास किया यूपीएससी**

इतनी सारी बैकलाग आने के बाद उनके साथ पढ़ने वाले छात्र और आसपास के लोग उन्हें एक 'फेलर' के रूप में देखने लगे थे। हर तरफ से मिलने वाले तानों ने समीर को अंदर से झकझोर दिया। उन्होंने तय किया कि वे इस नाकामी के साथ अपनी जिंदगी नहीं बिताएंगे। उन्होंने अपनी पुरानी गलतियों को सुधारा, अपनी पूरी ताकत पढ़ाई में झोंक दी और सबसे पहले अपनी इंजीनियरिंग की डिग्री पूरी की। इसके बाद उन्होंने देश की सबसे प्रतिष्ठित और कठिन मानी जाने वाली प्रशासनिक सेवा परीक्षा (यूपीएससी सीएसइ) की तैयारी करने का एक बड़ा फैसला लिया।

समीर शर्मा ने बताया कि परीक्षा से महज १८ महीने पहले तक उन्होंने ठीक से यूपीएससी का नाम भी नहीं सुना था। लेकिन जब उन्होंने तैयारी करने की ठानी, तो उन्होंने शून्य से शुरुआत की और अगले १८ महीनों में अपनी पूरी जान लगा दी। उन्होंने ऑल इंडिया रैंक १८२ हासिल की और साल २०११ में एजीएमयूटी कैडर के तहत भारतीय पुलिस सेवा (आयपीएस) में शामिल हुए।

**सोशल मीडिया पर वायरल हुई सफलता की कहानी**

जब उन्होंने यूपीएससी की तैयारी शुरू की, तो कई लोगों को लगा कि एक औसत छात्र भला इतनी बड़ी परीक्षा कैसे पास कर पाएगा। लेकिन समीर ने दिन-रात एक करके पढ़ाई की और अपने दृढ़ संकल्प के बल पर सिविल सेवा परीक्षा को सफलतापूर्वक पास कर दिखाया। आज वह भारतीय पुलिस सेवा (आयपीएस) के एक सम्मानित अधिकारी के रूप में देश की सेवा कर रहे हैं। समीर शर्मा की यह यात्रा सिखाती है कि "हार तब नहीं होती जब आप गिरते हैं, हार तब होती है जब आप उठने से मना कर देते हैं।"

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोळा रोड, धुळे






## फक्त २ मिनिटांचा चमत्कार!

### 'ओम'च्या उच्चाराने शरीरात होतील ५ मोठे बदल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

'ओम' हा केवळ एक अध्यात्मिक किंवा धार्मिक मंत्र नसून, तो एक वैश्विक ध्वनी आहे. ज्याचा उच्चार केल्याने मानसिक, शारीरिक आणि वैज्ञानिक फायदे होतात.

**मनावर आणि शरीरावर परिणाम**

'ओम' चा उच्चार करताना शरीरात निर्माण होणारी कंपने मनावर आणि शरीरावर परिणाम करतात.

**'ओम' शब्दाचा अर्थ**

'ओम' हा शब्द अ, उ, म या तीन अक्षरांनी बनलेला आहे. जेव्हा ही तीन अक्षरे एकत्र उच्चारली जातात तेव्हा शरीराच्या वेगवेगळ्या भागात विशिष्ट कंपने निर्माण होतात.

**'अ' चा उच्चार करण्याचे फायदे**

जेव्हा तुम्ही 'अ' चा उच्चार करता, तेव्हा छाती आणि पोटाच्या भागात कंपने जाणवतात. यामुळे फुफ्फुसांची कार्यक्षमता वाढते आणि पचनक्रिया सुधारते.

**'उ' चा उच्चार करण्याचे फायदे**

'३' चा उच्चार केल्याने पोटापासून गळ्यापर्यंत आणि छातीच्या मध्यभागात कंपने निर्माण होतात. यामुळे श्वसनमार्ग मोकळा होतो आणि थायरॉईड ग्रंथीचे कार्य सुधारते.

**'म' चा उच्चार करण्याचे फायदे**

जेव्हा तुम्ही ओठ बंद करून 'म' चा उच्चार करता, तेव्हा त्याची कंपने थेट मेंदू आणि कवटीच्या भागात निर्माण होतात. या कंपनाने मन शांत होते.

**'ओम' च्या उच्चाराचे फायदे**

'ओम' च्या उच्चारामुळे मेंदूतील लहरी सक्रिय होतात. यामुळे एकाग्रता वाढते आणि स्मरणशक्ती वाढण्यास मदत होते. उच्च रक्तदाब असणाऱ्यांनी 'ओम' चा उच्चर केल्याने रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते.

# भारतात खाटू श्याम बाबांची किती प्रमुख मंदिरे आहेत?

## ३ मूळ मंदिरे नेमकी कुठे आहेत माहिती जाणून घ्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हारे का सहारा बाबा श्याम हमारा : भगवान श्रीकृष्ण यांनी बर्बरिकला आशीर्वाद दिला होता, की कलियुगात त्यांच्या या नावाने पूजा केली जाईल आणि भक्तांना त्यांचे आशीर्वाद मिळतील. म्हणूनच खाटू श्याम बाबांच्या भक्तांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. आता देशभरात हजारो श्याम बाबांची मंदिरे आहेत. चला १० प्रमुख मंदिरांबद्दल आणि मूळ तीन मंदिरांबद्दल थोडक्यात माहिती घेऊया. श्याम बाबांना 'हारे का सहारा' आणि 'कलियुगाचा अवतार' मानले जाते. भक्त त्यांना 'शीश का दानी' देखील आदराने म्हणतात.




**खाटू श्याम बाबांची मूळ तीन मंदिरे**

**१) मुख्य धाम : खाटू श्याम मंदिर (राजस्थान)**

**मूळ मंदिर :** हे बाबा श्याम यांचे सर्वांत प्रमुख आणि प्राचीन मंदिर आहे. भारतात खाटू श्याम बाबांना समर्पित अनेक महत्त्वाची मंदिरे आहेत. त्यापैकी राजस्थानच्या सिकर जिल्ह्यातील एक सर्वांत प्रमुख आणि मूळ मानले जाते.

**स्थान :** खाटू गाव, सीकर जिल्हा, राजस्थान.

विशेषतः बर्बरिक (श्याम बाबा) यांचे डोके येथे विराजमान आहे. फाल्गुन मेळ्यात लाखो भाविक येथे गर्दी करतात.

**२) मुख्य मंदिर : खाटू श्याम मंदिर (राजस्थान)**

**रिंगस :** खाटू श्याम मंदिर देखील आहे जेथे खाटू श्यामजींची पूजा केली जाते. खाटू धामला जाण्यापूर्वी भाविक रिंगसला भेट देतात. येथून अनेक भाविक पायी खाटूकडे 'निशाण' (ध्वज) घेऊन जातात. हे मंदिर खाटू धामच्या मंदिराइतकेच प्राचीन आहे. निशाण वाहून नेण्याचे हे ठिकाण आहे.

**३) मुख्य मंदिर : खाटू श्याम मंदिर (हरियाणा)**

**धड मंदिर :** हरियाणाच्या हिसार जिल्ह्यातील बीड गावात (किंवा काही मान्यतेनुसार पानिपतमधील चुलकणा धाम) खाटू श्यामजी यांच्या धडाची पूजा केली जाते. पौराणिक कथेनुसार बर्बरिकने येथे आपले डोके दान केले होते, म्हणून या जागेला धड स्थळ म्हणून ओळखले जाते.

**धड स्थळ :** बीड गाव, हिसार, हरियाणा (काही समजुतींमध्ये चुलकाना धाम). हे स्थळ महाभारतातील मुख्य पात्र बर्बरिकच्या आत्मत्यागाशी संबंधित आहे.

**हरियाणामधील इतर मंदिरे :** बाबांचे विशेष दरबार सिरसा (घंटाघर चौक), हिसार आणि भिवानी येथे आहेत.

**खाटू श्याम बाबांची इतर मंदिरे**

**४) दिल्ली :** खाडी बावली (सर्वांत जुने), जनकपुरी, अलीपूर आणि शाहदरा येथे आहेत.

**५) उत्तर प्रदेश :** मोठी श्याम मंदिरे लखनौ, वाराणसी आणि आग्रा येथे आहेत.

**६) बिहार :** पाटणा सिटी (चौक), भागलपूर (कहलगाव) आणि कटिहार येथे आहेत.

**७) पश्चिम बंगाल :** कोलकातामध्ये बडा बाजार आणि चित्तरंजन अव्हेन्यूजवळ प्रसिद्ध दरबार आहेत.

**८) महाराष्ट्र :** मुंबई (मालाड पश्चिम) येथे खाटू श्यामजींना समर्पित एक सुंदर मंदिर आहे.

**९) ओडिशा :** बरगड जिल्ह्यातील भाटली धाम हे 'ओडिशाचे खाटू' मानले जाते.

**१०) मध्य प्रदेश :** श्री खाटू श्याम सेवक मंडळ (माळवी मंदिर). ए. बी. रोड, इंदूर. हे शहरातील सर्वांत जुने आणि प्रमुख केंद्रांपैकी एक आहे. खाटू श्याम मंदिर, कबीर खेडी, अंबिकापुरी खाटू श्याम धाम, श्री खाटू श्याम मंदिर (बाणगंगा), खाटू श्याम महाराज मंदिर (नंदा नगर), खाटू श्याम मंदिर (सोमानी नगर), खाटू श्याम मंदिर (चंद्र नगर) आणि आणखी काही ठिकाणीही मंदिरे अस्तित्वात आहेत.

# योगिनी एकादशी का व्रत करने से कौन-कौन से फल प्राप्त होते हैं?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पुराणों में वर्णित योगिनी एकादशी व्रत का केवल धार्मिक दृष्टि से ही नहीं, बल्कि आत्मसंयम, सात्विक जीवन और ईश्वर के प्रति समर्पण की भावना को भी मजबूत करती है। इस दिन श्रद्धालु उपवास रखकर भगवान विष्णु का पूजन करते हैं, 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' मंत्र का जप करते हैं और जरूरतमंदों को दान-पुण्य भी करते हैं। योगिनी एकादशी की कथा केवल एक राजा, माली और ऋषि की पौराणिक कहानी नहीं है, बल्कि यह मानव जीवन, अध्यात्म और मनोविज्ञान से जुड़ा एक गहरा संदेश है।

योगिनी एकादशी का व्रत करने से मुख्य रूप से निम्नलिखित फलों की प्राप्ति होती है :

**१) समस्त पापों का नाश (प्रायश्चित का फल)**

जाने-अनजाने में इंसान से कई गलतियां या पाप हो जाते हैं। मान्यताओं के अनुसार, योगिनी एकादशी का व्रत रखने से व्यक्ति के जीवन के सभी संचित (पुराने) पाप नष्ट हो जाते हैं और आत्मा शुद्ध होती है।

**२) गंभीर बीमारियों और कोढ़ से मुक्ति**

जैसा कि पौराणिक कथा में बताया गया है कि राजा कुबेर के शाप से कोढ़ी हुए हेम माली को इस व्रत से नया जीवन मिला था। इसलिए माना जाता है कि इस व्रत को करने से त्वचा संबंधी रोग, कोढ़ और अन्य असाध्य या गंभीर बीमारियों से मुक्ति मिलती है। यह व्रत अच्छी सेहत और आरोग्य प्रदान करता है।

**३) अठासी हजार ब्राह्मणों को भोजन कराने के बराबर पुण्य**

शास्त्रों में लिखा है कि जो फल ८८,००० ब्राह्मणों को भरपेट भोजन कराने से मिलता है, वही विशाल पुण्य फल केवल एक योगिनी एकादशी का व्रत पूरी निष्ठा से रखने से प्राप्त हो जाता है।



**४) जीवन में सुख-समृद्धि और पारिवारिक खुशहाली**

इस व्रत के प्रभाव से व्यक्ति के जीवन से दरिद्रता और आर्थिक परेशानियां दूर होती हैं। भगवान विष्णु/ नारायण की कृपा से घर में धन-धान्य के भंडार भरते हैं और पारिवारिक जीवन में सुख-शांति का वास होता है।

**५) अंत समय में मोक्ष की प्राप्ति**

यह व्रत न केवल इस लोक में सुख देता है, बल्कि परलोक भी सुधारता है। जो भक्त इस दिन पूरी श्रद्धा से व्रत रखते हैं और भगवान विष्णु की पूजा करते हैं, उन्हें मृत्यु के बाद विष्णु लोक (स्वर्गलोक/ बैकुंठ धाम) या स्वर्गलोक में स्थान मिलता है। वे जीवन-मरण के चक्र से मुक्त हो जाते हैं।

संक्षेप में कहें तो : यदि कोई व्यक्ति अपने जीवन के कष्टों, बीमारियों और पापों से छुटकारा पाकर मानसिक शांति और सुख-समृद्धि चाहता है, तो उसके लिए योगिनी एकादशी का व्रत किसी वरदान से कम नहीं है।

**इस बार योगिनी एकादशी व्रत समय**

योगिनी एकादशी शुक्रवार, जुलाई १०, २०२६ को
आषाढ़ मास के कृष्ण पक्ष की एकादशी तिथि का प्रारम्भ- १० जुलाई २०२६ को सुबह ०८ : १६ से,
एकादशी तिथि समाप्त- ११ जुलाई, २०२६ को शाम ०५:२२ पर।
पारण/ व्रत तोड़ने का समय-
११ जुलाई को रात्री ०१:५० से सुबह ०४:३६ तक
जो श्रद्धालु १० जुलाई को व्रत रखेंगे, उनके लिए पारण (व्रत खोलने) का शुभ समय उपरोक्तानुसार रहेगा।
पारण तिथि के दिन हरि वासर समाप्त होने का समय- सुबह १०:३२ पर।
गौण योगिनी एकादशी शनिवार, ११ जुलाई २०२६ को
गौण योगिनी एकादशी तिथि का प्रारम्भ- १० जुलाई २०२६ को सुबह ०८:१६ बजे
एकादशी तिथि समाप्त- ११ जुलाई २०२६ को शाम ०५:२२ बजे।
गौण एकादशी के लिए पारण या व्रत तोड़ने का समय- १२ जुलाई को सुबह ०५:३२ से रात्री ०८:१८ पर।

# अग्निपुराणातील प्रमुख कथा आणि धार्मिक महत्त्व

## जाणून घ्या या महापुराणाची वैशिष्ट्ये

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अग्निपुराण हे अठरा महापुराणांमधील एक अत्यंत महत्त्वाचे आणि बहुआयामी पुराण आहे. मत्स्यावतार, कूर्मावतार, नरसिंहावतार, वामनावतार, रामकथा, कृष्णकथा, महाभारताचा सारांश, गंगावतरण, सूर्यवंश आणि चंद्रवंश यांच्या कथांसह धर्म, आयुर्वेद, वास्तुशास्त्र, ज्योतिष, राज्यशास्त्र आणि युद्धनीती यांचे सखोल ज्ञान या ग्रंथात आढळते.

भारतीय संस्कृतीतील अठरा महापुराणांना विशेष महत्त्व आहे. या अठरा महापुराणांमध्ये अग्निपुराण हे आठवे महापुराण मानले जाते. अग्निदेवांनी महर्षी वसिष्ठ यांना सांगितलेले आणि नंतर वेदव्यासांनी संकलित केलेले हे पुराण केवळ धार्मिक ग्रंथ नसून प्राचीन भारतातील ज्ञान, विज्ञान, राजकारण, युद्धशास्त्र, वास्तुशास्त्र, आयुर्वेद, ज्योतिष आणि साहित्य यांचा विशाल खजिना आहे. त्यामुळे अग्निपुराणाला अनेक विद्वान "भारतीय ज्ञानकोश" असेही संबोधतात.

अग्निपुराणामध्ये सुमारे ३८० हून अधिक अध्याय असून हजारो श्लोकांचा समावेश आहे. या पुराणाचे वैशिष्ट्य म्हणजे यात केवळ देवदेवतांच्या कथा नाहीत, तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राला मार्गदर्शन करणारे ज्ञान दिलेले आहे.

**अग्निपुराणाची पार्श्वभूमी**

पुराणानुसार अग्निदेवांनी महर्षी वसिष्ठांना धर्म, अध्यात्म आणि विविध विद्यांचे ज्ञान सांगितले. पुढे हे ज्ञान सूतजींनी ऋषींना कथन केले. त्यामुळे या ग्रंथाला "अग्निपुराण" असे नाव प्राप्त झाले. हे पुराण वैष्णव, शैव आणि शक्ती या सर्व परंपरांचा समन्वय करणारे मानले जाते. यात भगवान विष्णू, भगवान शिव, देवी, सूर्य आणि इतर देवतांची महती वर्णन केली आहे.



**अग्निपुराणातील प्रमुख कथा**

अग्निपुराणामध्ये अनेक पौराणिक कथा, अवतारकथा आणि धार्मिक आख्यायिका आढळतात. त्यापैकी काही महत्त्वाच्या कथासृष्टी निर्मितीची कथा पुराणाच्या प्रारंभी ब्रह्मांडाची निर्मिती कशी झाली, ब्रह्मदेवांचा जन्म कसा झाला आणि सृष्टीचा विस्तार कसा झाला याचे वर्णन आहे. या कथेनुसार परमात्म्याच्या इच्छेतून ब्रह्मदेव प्रकट झाले. त्यांनी देव, ऋषी, मानव, प्राणी आणि संपूर्ण विश्वाची निर्मिती केली.

**मत्स्यावताराची कथा**

प्रलयकाळात संपूर्ण पृथ्वी जलमय झाली होती. त्या वेळी भगवान विष्णूंनी मत्स्यावतार धारण करून राजा मनू यांचे रक्षण केले. भगवान मत्स्याने मनूंना नौकेत बसवून वेद आणि सृष्टीचे बीज सुरक्षित ठेवले. या कथेत धर्मरक्षण आणि ज्ञानसंरक्षणाचा संदेश दिला आहे.

**कूर्मावताराची कथा**

देव आणि दानवांनी अमृतप्राप्तीसाठी समुद्रमंथन केले. त्यावेळी मंदर पर्वत समुद्रात बुडू लागला. तेव्हा भगवान विष्णूंनी कासवाचे रूप धारण करून पर्वत आपल्या पाठीवर धारण केला. त्यामुळे समुद्रमंथन यशस्वी झाले आणि अमृताची प्राप्ती झाली.

**वराहावताराची कथा**

हिरण्याक्ष नावाच्या दैत्याने पृथ्वीला पाताळात नेले होते. तेव्हा भगवान विष्णूंनी वराहाचे रूप धारण करून हिरण्याक्षाचा वध केला आणि पृथ्वीला पुन्हा तिच्या स्थानावर स्थापित केले. ही कथा अधर्मावर धर्माच्या विजयाचे प्रतीक मानली जाते.

**नरसिंहावताराची कथा**

हिरण्यकशिपू नावाच्या अत्याचारी राक्षसाचा अंत करण्यासाठी भगवान विष्णूंनी नरसिंह अवतार घेतला.

भक्त प्रल्हादाच्या रक्षणासाठी भगवान नरसिंह खांबातून प्रकट झाले आणि त्यांनी हिरण्यकशिपूचा वध केला.

ही कथा भक्ती आणि श्रद्धेच्या सामर्थ्याचे दर्शन घडवते.

**वामनावताराची कथा**

राजा बळी हा अत्यंत पराक्रमी आणि दानशूर राजा होता. त्याच्या वाढत्या सामर्थ्यामुळे देव घाबरले. भगवान विष्णूंनी वामन ब्राह्मणाचे रूप धारण करून बळीकडे तीन पावलांची जमीन मागितली. नंतर विराट रूप धारण करून तीन पावलांत संपूर्ण विश्व व्यापले.

**भगवान श्रीरामांची कथा**

अग्निपुराणात श्रीरामांची कथा सांगितली आहे.

**भगवान श्रीकृष्णांची कथा**

श्रीकृष्णांचा जन्म, कंसवध, गोवर्धन पर्वत उचलणे, गोकुळातील लीला, महाभारतातील भूमिका आणि धर्मसंस्थापनेचे कार्य यांचे वर्णन अग्निपुराणात आढळते.

**महाभारताचा सारांश**

अग्निपुराणात महाभारतातील प्रमुख घटनांचा सार दिलेला आहे.

**पांडवांचा जन्म**

द्यूतसभा
वनवास
कुरुक्षेत्र युद्ध
भगवद्गीतेचा संदेश
कौरवांचा पराभव

यांच्या माध्यमातून धर्म आणि कर्तव्य यांचे महत्त्व स्पष्ट केले आहे.

**सूर्यवंश आणि चंद्रवंशाच्या कथा**

भारतीय राजवंशांचा इतिहास समजण्यासाठी अग्निपुराण महत्त्वाचे मानले जाते.

**गंगावतरणाची कथा**

राजा भगीरथाच्या तपश्चर्येमुळे स्वर्गातील गंगा पृथ्वीवर अवतरली. भगवान शिवांनी आपल्या जटांमध्ये गंगेला धारण करून तिचा वेग नियंत्रित केला. ही कथा तप, श्रद्धा आणि लोककल्याणाचे प्रतीक मानली जाते.

अग्निपुराण धर्म, नीती, भक्ती आणि ज्ञान यांचा समन्वय घडवते. यात मनुष्याने सत्य, दया, संयम, दान आणि धर्माचे पालन करावे असा संदेश दिला आहे. पुराणात असे सांगितले आहे, की ज्ञानाशिवाय धर्म अपूर्ण आहे आणि धर्माशिवाय जीवन अपूर्ण आहे.

# मृत्यूनंतरही कर्जाचा हिशेब होतो?

## कर्ज आणि कर्म यांचा संबंध काय? गरुडपुराणातील नियम जाणून थक्क व्हाल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपण अनेकदा पाहतो, काही लोक कर्ज घेतात, पण काही कारणास्तव त्यांना कर्ज फेडणे शक्य होत नाही, किंवा काही लोक पैसे उधार घेतात, पण ते त्यांना परत करत नाहीत, बऱ्याचदा असे म्हटले जाते की, आयुष्याच्या शेवटी सर्व हिशोब फेडले जातात. पण गरुड पुराण, एक असा महान हिंदू ग्रंथ आहे, जो या विषयाकडे पूर्णपणे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहतो. गरूडपुराणानुसार, कर्ज हा केवळ एक आर्थिक व्यवहार नाही, तर त्याचा संबंध कर्माशी असतो, ते एक कर्मिक कर्ज आहे, जे मृत्यूनंतरही आत्म्यावर परिणाम करू शकते. धार्मिक श्रद्धेनुसार, जर एखादी व्यक्ती जाणूनबुजून कोणाचे पैसे परत न करता हे जग सोडून गेली, तर तिला मृत्यूनंतरच्या जीवनात आपल्या कर्मांचे परिणाम भोगावे लागतात. जाणून घेऊया गरुड पुराणात याबाबत काय म्हटलंय..

**मृत्यूनंतरही कर्जाचा हिशोब होतो? गरुड पुराणातील नियम जाणून घ्या**

गरुड पुराणानुसार दुसऱ्याचे पैसे घेणे आणि ते परत न करणे ही केवळ एक आर्थिक चूक नाही, तर धार्मिक आणि नैतिक जबाबदारी टाळणे देखील आहे. जर एखादी व्यक्ती सक्षम असूनही जाणूनबुजून कर्ज फेडण्यात अयशस्वी ठरली, तर हे कर्म मृत्यूनंतरही तिचा पाठलाग करते. धार्मिक ग्रंथांमध्ये असे म्हटले आहे की प्रत्येक व्यक्ती आपल्या कर्माचे फळ भोगतो आणि कर्ज हे त्या कर्माचाच एक भाग मानले जाते.



**कर्ज न फेडता मृत्यू झाल्यास...**

धार्मिक मान्यतेनुसार मृत्यूनंतर यमाचे दूत अशा आत्म्याला यमलोकापर्यंत पोहोचवतात. जर एखाद्या व्यक्तीने इतरांची संपत्ती स्वतःकडे ठेवली असेल आणि ती परत करण्याचा प्रयत्नही केला नसेल, तर त्याला वाटेत विविध प्रकारच्या यातना सहन कराव्या लागतात. गरुड पुराणात वैतरणी नदीचाही उल्लेख आहे. असे म्हटले जाते की ही नदी अत्यंत भयानक आहे. असा विश्वास आहे की जो आत्मा आपले ऋण फेडण्यात अयशस्वी होतो, त्याला ही नदी ओलांडताना असह्य वेदना सहन कराव्या लागतात. हे वर्णन लोकांना त्यांच्या कृतींबद्दल जागरूक राहण्यास शिकवते.

**कर्जदाराच्या घरी सेवकाचा जन्म?**

गरुडपुराणात पुनर्जन्माच्या संकल्पनेचाही उल्लेख आहे. धार्मिक श्रद्धेनुसार, जर एखाद्या व्यक्तीचे ऋण फेडले गेले नाही, तर त्याला पुढच्या जन्मात त्याचे परिणाम भोगावे लागू शकतात. काही श्रद्धांनुसार, असा आत्मा त्याच कर्जदाराच्या घरी कोणत्या ना कोणत्या रूपात पुनर्जन्म घेऊ शकतो. काहींच्या मते तो सेवक म्हणून जन्माला येईल, तर काहींच्या मते तो बैल, घोडा किंवा इतर ओझे वाहणारा प्राणी म्हणून सेवा करेल. असा विश्वास आहे की या सेवेद्वारे त्यांचे कर्मिक ऋण हळूहळू फेडले जाते. या बाबी धार्मिक श्रद्धा म्हणून पाहिल्या जातात आणि श्रद्धेच्या कक्षेतच समजल्या जातात.

**अकाली मृत्यू झाल्यास...**

धार्मिक ग्रंथांमध्ये सांगितलेला एक महत्त्वाचा मुद्दा असा आहे, की जर एखाद्या व्यक्तीचा कर्ज फेडण्याचा हेतू होता, परंतु अकाली मृत्यूमुळे तो किंवा ती तसे करू शकली नाही, तर तिची किंवा त्याची परिस्थिती वेगळी मानली जाते. अशा प्रकरणांमध्ये, जाणूनबुजून कर्ज फेडण्यात अयशस्वी होण्याइतका गंभीर दोष मानला जात नाही. धर्मग्रंथांनुसार, जर मृत व्यक्तीच्या मुलांना किंवा वारसांना त्याच्या किंवा तिच्या मालमत्तेचा फायदा होत असेल, तर त्यांनी त्याची किंवा तिची कायदेशीर कर्जे फेडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. धार्मिक श्रद्धेनुसार, यामुळे पूर्वजांच्या आत्म्याला शांती मिळते आणि कुटुंबाचे नैतिक कर्तव्य पूर्ण होते.

**दानधर्म केल्याने पुण्यकर्मांचे फळ मिळते का?**

गरुडपुराणानुसार जर एखाद्या व्यक्तीवर कोणाचे कर्ज असेल, तर केवळ दानधर्म केल्याने त्याला किंवा तिला लगेचच पूर्ण फळ मिळत नाही. प्रथम ते न फेडलेले कर्ज फेडले जाते आणि त्यानंतरच पुण्यकर्मांचे फळ मिळते. याचा संदेश असा आहे की, धार्मिक कार्यांबरोबरच सांसारिक जबाबदाऱ्या पार पाडणेही तितकेच महत्त्वाचे आहे. धर्माचे पालन केवळ प्रार्थना करूनच होत नाही, तर प्रामाणिकपणाने जीवन जगूनही होते.

**गरुडपुराणाचा उद्देश केवळ शिक्षेची भीती निर्माण करणे हा नाही...**

गरुडपुराणाचा उद्देश केवळ शिक्षेची भीती निर्माण करणे हा नाही, तर लोकांना प्रामाणिकपणा, जबाबदारी आणि सत्कर्मे करण्यास प्रेरित करणे हा आहे. धार्मिक ग्रंथ हा संदेश देतात की जीवनात स्वीकारलेले प्रत्येक कर्तव्य वेळेवर पूर्ण केले पाहिजे. मग ते आर्थिक कर्ज असो, सामाजिक जबाबदारी असो किंवा नैतिक वचन असो, प्रत्येक कृतीचा व्यक्तीच्या जीवनावर आणि धार्मिक श्रद्धेनुसार, त्यांच्या मृत्यूनंतरच्या जीवनावरही परिणाम होतो, असे मानले जाते.